RNI No. MAHBIL /2009/3173

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—अ

वर्ष ५, अंक ९७(२)] शुक्रवार, ऑगस्ट २३, २०१९/भाद्र १, शके १९४१ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक २१७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ ऑगस्ट २०१९

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

मत्स्यआ. २०१६/प्र.क्र.१५३/पदुम-१२.— भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि यासंबंधीत अस्तित्वात असलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश अधिक्रमित करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय सेवेतील **सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय/प्रकल्प व्यवस्थापक, दापचरी, गट-अ (तांत्रिक) (राजपत्रित), पदाच्या** सेवाभरतीचे विनियम करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय/प्रकल्प व्यवस्थापक, दापचरी, गट-अ (तांत्रिक) (राजपत्रित), सेवाप्रवेश नियम, २०१९ असे संबोधण्यात यावे.

२. या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,

(अ) " आयुक्तालय " याचा अर्थ कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालय.

(ब) " पदवी " याचा अर्थ सांविधिक विद्यापीठाची पदवी.

(क) " विभाग " याचा अर्थ कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग.

(ड) " शासन " याचा अर्थ महाराष्ट्र शासन.

३. "सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय/प्रकल्प व्यवस्थापक, दापचरी, गट-अ (तांत्रिक) (राजपत्रित) या पदावरील नेमणुका एकतर,

(अ) मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी किंवा मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी किंवा अभिरक्षक किंवा प्रशिक्षण व विस्तार अधिकारी गट-ब (तांत्रिक) (राजपत्रित) हे पद धारण करणा-या व या पदावर किमान ३ वर्षे नियमित सेवा पूर्ण केलेल्या व्यक्तींमधून ज्येष्ठता अधीन पात्रता या निकषावर पदोन्नतीने,



Scanned by CamScanner

किंवा

(ब) खालील अटी पूर्ण करणा-या उमेदवारांमधून नामनिर्देशनाने,--

(१) ज्यांचे वय १९ वर्षांपेक्षा कमी नसलेल्या आणि खुल्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी ३८ वर्षांपेक्षा जास्त वय नसलेल्या आणि मागासवर्गीय व्यक्तींसाठी ४३ वर्षांपेक्षा जास्त नसलेल्या, **आणि**

(२) ज्यांनी किमान मत्स्यविज्ञान विषयातील पदवी (B.F.Sc.) किंवा केंद्रिय मत्स्यकी शिक्षण संस्था, भारत सरकार या संस्थेची, **किमान द्वितीय श्रेणीतील पदवी धारण केलेली असावी.**

४. नियम ३ मध्ये नमूद पदावर नामनिर्देशनाने नियुक्त केलेली व्यक्ती दोन वर्षांच्या परिविक्षा कालावधीवर राहील. परिविक्षा कालावधी कमाल एक वर्षापर्यंत वाढविता येईल. पदावर नियुक्त व्यक्तीने परिविक्षा कालावधीत विभागीय परीक्षा उत्तीर्ण करणे व परिविक्षा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील. त्याने परिविक्षा कालावधीत विभागीय परीक्षा उत्तीर्ण न केल्यास अथवा तो सदर पदासाठी योग्य नसल्याचे आढळल्यास, त्याची सेवा समाप्त करण्यास पात्र राहील.

५. नियम ३ मध्ये नमूद पदावर पदोन्नतीने व नामनिर्देशनाने नियुक्तीचे प्रमाण ५०:५० असे राहील.

६. नियम ३ मध्ये नमूद पदावर नियुक्त उमेदवाराने यासंबंधी तयार केलेल्या नियमानुसार, मराठी व हिंदी भाषा परीक्षा यापूर्वी उत्तीर्ण केली नसल्यास वा सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसल्यास त्याला सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

७. नियम ३ मध्ये नमूद पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणी संबंधीचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

८. नियम ३ मध्ये नमूद पदावर नियुक्त व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदलीस पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अनूप कुमार,**
शासनाचे प्रधान सचिव.

Scanned by CamScanner

## AGRICULTURE, ANIMAL HUSBANDRY, DAIRY DEVELOPMENT AND FISHERIES DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 22nd August 2019

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. Matsya. 2016/C.R. 153/ADF-12.— In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and in supersession of all existing rules, orders or instruments made in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules, regulating recruitment to the post of Assistant Commissioner Fisheries/Project Manager Dapchari, Group-A (Technical) (Gazetted), in the Maharashtra Fisheries Services under the Agriculture, Animal Husbandry, Dairy Development and Fisheries Department, as follows, namely :—

1. These rules, may be called the Assistant Commissioner Fisheries/Project Manager Dapchari, Group-A (Technical) (Gazetted) (Recruitment) Rules, 2019.

2. In these rules, unless the context requires otherwise,—

*(a)* "Commissionerate" means the Commissionerate of Fisheries under the Agriculture, Animal Husbandry, Dairy Development and Fisheries Department;

*(b)* "Degree" means a degree of a statutory university;

*(c)* "Department" means the Agriculture, Animal Husbandry, Dairy Development and Fisheries Department;

*(d)* "Government" means the Government of Maharashtra.

3. Appointment to the post of the Assistant Commissioner Fisheries/Project Manager Dapchari, Group-A (Technical) (Gazetted) shall be made **either** :—

*(a)* By promotion of a suitable person on the basis of seniority subject to fitness from amongst the persons, holding the post of Fisheries Development Officer or Fisheries Training Officer or Curator or Training and Extension Officer, Group B (Technical) (Gazetted), having not less than 3 years regular service **on that** post ;

or

*(b)* By nomination from amongst the candidates who,

*(i)* are not less than nineteen years of age and not more than thirty eight years of age in case of persons belonging to General Class and not more than forty three years of age in case of persons belonging to Backward Class, **and**

*(ii)* Possess Degree in Fishery Science (B.F.Sc.) or Degree of Central Institute of Fisheries Education, Government of India **in at least Second Class.**

4. A person appointed by nomination to the post shall be on probation for a period of two years. The probation period may be extended maximum up to one year. A person appointed shall be required to pass the prescribed departmental examination within the probation period to complete the probation period satisfactorily. If he does not pass the prescribed departmental examination or does not complete the probation period satisfactorily or is found not suitable for the post, his services shall liable to be terminated.

Scanned by CamScanner

5. Appointment to the post by promotion and nomination shall be made in the ratio of 50:50.

6. A person appointed to the post shall be required to pass the examinations in Marathi and Hindi languages, according to the rules made in that behalf, unless he has already been passed, or has been exempted from passing those examinations.

7. A person appointed to the post shall possess a certificate in computer operation as prescribed by the Directorate of Information Technology, Government of Maharashtra, from time to time.

8. A person appointed to the post shall be liable for transfer anywhere in the State of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

ANOOP KUMAR,
Principal Secretary to Government.

Scanned by CamScanner